जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन कक्ष जिल्हा परिषद, सिंधुदुर्ग.

जि.प. इमारत, दुसरा मजला, सिंधुदुर्गनगरी

## दरपत्रक सुचना

मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद सिंधुदुर्ग यांना सन 2017-2018 मध्ये खालील साहित्य पुरविणेसाठी अधिकृत विक्रेते/पुरवठादार यांचेकडुन खालील तपशिलानुसार बंद केलेल्या लखोट्यातुन दरपत्रके मागवण्यात येत आहे. सबब इच्छुक विक्रेते/पुरवठादार यांचेकडून दरपत्रके जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन कक्ष, जिल्हा परिषद सिंधुदुर्ग येथे दि. २५/७/१७ ------------ते दि. ३१/०७/२०१७----वाजेपर्यंत स्विकारणात येतील. त्यानंतर आलेली दरपत्रके स्विकारण्यात येणार नाहीत याची नोंद घ्यावी.

सदर दरपत्रके त्याच दिवशी दि. ३१/०७/२०१७ रोजी ________ वाजता किंवा लगतच्या दिवशी उघडण्यात येतील

दरपत्रके प्राप्त झालेल्या दरपत्रकांपैकी कोणतेही दरपत्रक किंवा सर्व दरपत्रके कोणतेही कारण न देता नाकारण्याचा अधिकार निम्नस्वाक्षरीत यांनी राखुन ठेवलेला आहे. याबाबत संस्थेश स्पष्टीकरण मागता येणार नाही.

प्रपत्र ड

| अक्र | तपशिल | एकुण नग | अंदा. र.रु. सर्व करासहीत (प्रति नग) | एकुण अंदा. खर्च सर्व करासहीत |
|---|---|---|---|---|
| 1 | सांडपाणी व घनकचरा व्यवस्थापन- कॉफी टेबल बुक - अंदा.पाने 40 (दोन्ही बाजूस कलर प्रिंटीग) पानांची पुस्तिका उपलब्ध करुन देणे. गॅली बायडींग - पुठ्ठा सहीत , पेपर A4 -170 GSM, स्पॉट लॅमिनेशन प्रिंटीग | 500 | 400/- | 200000.00 |
| | | | एकुण | 200000.00 |

दरपत्रकाच्या अटी व शर्ती

आवश्यक तांत्रिक दस्तऐवज -

अ)1 ला लखोटा

1) नोंदणी प्रमाणपत्र व GST नोंदणी क्रमांक आवश्यक

2)पॅन कार्डची प्रमाणित प्रत

ब) 2 रा लखोटा

1) स्वसाक्षांकित व्यापारी दरपत्रके सादर करणेची आहेत.

1. तांत्रिक व व्यापारी लखोटा असे स्वतंत्रपणे नमूद करून कार्यालयात दोन लखोटे सादर करणेचे आहेत.
2. वरील नमुद मुळ कागदपत्रांची या कार्यालयाने मागणी केल्यास ती कागदपत्रे या कार्यालयाकडे सादर करणे पुरवठादारावर बंधनकारक राहील याची नोंद घ्यावी.
3. <u>दरपत्रकात दिलेला दर हा सर्व करासहीत एकत्रित धरुन अंकी व अक्षरी सुस्पष्ट देणे आवश्यक आहे</u> . अंकी व अक्षरी लिखाणात तफावत असेल तर त्या दोन्हीमध्ये कमी असलेला दर गृहित धरला जाईल, दरामध्ये खाडाखोड झाल्यास ती साक्षांकित करावी.
4. सदर दरपत्रकामध्ये दर्शविलेल्या अंदाजीत रक्कमेमध्ये बदल होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे मंजूर पुरवठाधारकाला अंदाजीत रक्कमेपेक्षा कमी अथवा अधिक रक्कमेचा पुरवठा आदेश देण्याचे अधिकार खाली सही करणायानी- राखुन ठेवलेले आहेत.
5. दरपत्रक निकालात काढण्यास सक्षम असलेल्या अधिकारी यांना आलेल्या सर्व किंवा त्यापैकी कोणतेही दरपत्रक नाकारण्याचा अधिकार राखून ठेवला आहे.
6. कमी अगर जास्त दराची दरपत्रक मंजूर करणे अगर नामंजूर करणे, फेर दरपत्रक मागविणे हे अधिकार खाली सही करणार यांना राखुन ठेवले आहेत.
7. दरपत्रकातील अटी व शर्ती या बाबत कोणत्याही प्रकारचा वाद निर्माण झाल्यास मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद सिंधुदुर्ग यांचा निर्णय अंतिम राहील.

ठिकाण.सिंधुदूर्गनगरी :

दिनांक:

मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद सिंधुदूर्ग.

जा.क्र. सिंजिप/जिपापस्वमि/IEC/ २४७ /17
जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन,
जिल्हा परिषदसिंधुदुर्ग ,
दिनांक 28/7/2017
प्रत: